# THE SALSETTE ESTATES (LAND REVENUE EXEMPTION) ABOLITION ACT, 1951

---

## साष्टी भूसंपत्ति बाबत (जमीन महसुलाची माफी रद्द करण्याविषयी) अधिनियम १९५१.

---

### अनुक्रमणिका


प्रारंभिक.

| कलमें. | | पान |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात. | ८६७ |
| २. | व्याख्या. | ८६७ |
| ३. | भूसंपत्तीतील जमिनी जमीनमहसुलास पात्र असणें आणि भूसंपत्ति धारकाचा जमीन महसूल वसूल करण्याचा, उत्तधिकाराचा किंवा मालकी नष्ट करण्याचा हक्क नष्ट होणें. | ८६८ |
| ४. | पडीत जमिनी वगैरे सरकारकडे निहित होणें | ८६८ |
| ५. | जंगलाबाबत हक्कें | ८६८ |
| ६. | भूसंपत्तीतील जमिनीस संहिता लागू करणें | ८६९ |
| ७. | जमिनीबाबतचें कोणतेहि हक्क नष्ट झाल्याबद्दल किंवा त्यांत बद्दल केल्याबद्दल नुकसान-भरपाई देण्याची रीत | ८६९ |
| ८. | मुदत. | ८७० |
| ९. | न्यायालय शुल्क. | ८७० |
| ९-अ. | सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९३ वा याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाडयांच्या संबंधात फेरतपासणीचे अधिकार. | ८७० |
| १०. | सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या उपबंधांअन्वयें भूसंपत्ति धारक व कुळें यांच्या संबंधांचे नियमन करणें. | ८७१ |
| ११. | नियम. | ८७१ |

अनुसूचि.

# सन १९५१ मुंबई अधिनियम क्रमांक ४७ *

[साष्टी भूसंपत्ति बाबत (जमीन महसुलाची माफी रद्द करण्याविषयी) अधिनियम, १९५१.]

[ १४ जानेवारी १९५२ ]

ह्या अधिनियमांत पुढील अधिनियम व आदेश यान्वयें सुधारणा व अनुकुलनें करण्यांत आली. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८

मुंबई विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९५६. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३

## मुंबई राज्यांतील मुंबई उपनगर व ठाणें जिल्ह्यांतील साष्टी बेटांतील विवक्षित भूसंपति धारकांना मिळत असलेली जमिनमहसूलाची सूट रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई राज्यांत मुंबई उपनगर व ठाणें जिल्ह्यांतील साष्टी बेटांतील विवक्षित भूसंपत्ती धारकांना मिळत असलेली जमीनमहसुलाची सूट यांत यापुढें दिलेल्या कारणांकरितां रद्द करणें आणि यांत यापुढें दिलेल्या इतर कित्येक गोष्टींची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्याअर्थी या अन्वयें पुढील प्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे.—

१. (१) या अधिनियमास साष्टी भूसंपत्ती बाबत ( जमीन महसुला बद्दलची माफी रद्द करण्याविषयी) अधिनियम १९५१ असें म्हणावें. लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या मुंबई उपनगर व ठाणें जिल्ह्यांतील गांवांना लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें ज्या तारखेस निदेश देईल त्या तारखेस अमलांत येईल.

२. (१) विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांही नसल्यास, या अधिनियमात— व्याख्या.

(अ) 'संहिता' या संज्ञेचा अर्थ, मुंबई जमीन महसूल संहिता १८७९ असा समजावा ;

(अअ) 'कलेक्टर या संज्ञेत, या अधिनियमान्वयें कलेक्टरची कर्तव्यें करण्यासाठीं व अधिकार चाल-विण्यासाठीं राज्य सरकारनें नेमलेला अधिकारी याचा समावेश होतो ;

(ब) 'भूसंपत्ति' या शब्दाचा अर्थ, अनुसूचित निर्दिष्ट केलेलें आणि कौलनाम्यान्वयें धारण केलेलें गांव किंवा त्याचा भाग असा समजावा ;

(क) 'भूसंपत्ति धारक' या संज्ञेचा अर्थ, भूसंपत्ति धारण करणारा असा समजावा व तींत त्याच्या मार्फत किंवा त्याच्या वतीनें वैधरित्या धारण करणाऱ्या कोणत्याहि इसमाचा समावेश होतो ;

(ड) 'कौल' या संज्ञेचा अर्थ ज्या पट्ट्यान्वयें, मक्त्याअन्वयें किंवा कबुलायतीअन्वयें राज्य सरकारकडून जमीन धारण करण्यांत येत असेल तो पट्टा, मक्ता किंवा कबुलायत असा समजावा;

(इ) 'कायम धारक' या संज्ञेचा अर्थ,कौल देण्यापूर्वी एखाद्या भूसंपत्तीतील जमिनीचा ज्याच्याकडे ताबा होता आणि ज्याचे हक्क भूसंपत्ती धारकानें मिळविलें नाहींत किंवा जो भूसंपत्ति धारकास आकार देऊन कोणतीहि जमीन कायम स्वरुपानें धारण करतो तो सुटीदार, शिलोत्रीदार, शेतकरी मालक किंवा धारक असा समजावा ;

(फ) 'अनुसूचि' या संज्ञेचा अर्थ ह्या अधिनियमास जोडलेली अनुसूचि असा समजावा;

(२) संहितेंत व्याख्या केलेलें परंतु या अधिनियमात व्याख्या न केलेलें शब्द आणि शब्द प्रयोग याचा, संहितेंत जो अर्थ दिलेला असेल तोच अर्थ असेल.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

भू-संपत्तीतील जमिनी जमीन-महसुलास जबाबदार असणें आणि भू-संपत्ति-धारकाचा जमीन-महसूल वसूल करण्याचा, उत्तराधिकाराचा किंवा मालकी नष्ट करण्याचा हक्क नष्ट होणें.

३. (१) कौलनामा, न्यायालयाचा कोणताहि हुकूमनामा किंवा आदेश किंवा इतर कोणताहि लेख किंवा त्यात्या वेळीं अमलांत असलेला कोणताहि विधी यांत कांहीं असलें तरीहि परंतु पोट-कलम (३) च्या उपबंधांस अधीन राहून,—

(अ) कोणताहि भूसंपत्तीतील सर्व जमिनी ह्या संहितेच्या व त्याअन्वयें केलेल्या नियमांच्या उपबंधांस अधीन राहून राज्य सरकारास जमीन महसूल भरण्यास पात्र आहेत व असतील आणि

(ब) (१) ज्या कोणत्याहि जमिनीचा ताबा भूसंपत्ति धारकाकडे भूसंपत्ति धारक या नात्यानें प्रत्यक्षपणें असेल किंवा त्याच्या मार्फत किंवा वतीनें धारण करणाऱ्या व कायमचा धारक म्हणून नसलेल्या इसमांकडे असेल त्या जमिनीच्या संबंधात भूसंपत्तिधारक, आणि

(२) कायम धारण करणारा यानें धारण केलेल्या अशा जमिनीच्या संबंधांत देणें असलेला जमिनमहसूल राज्य सरकारास भरण्यास प्रथमत: जबाबदार असेल आणि तो संहिता किंवा त्या अन्वयें केलेलें नियम किंवा त्यात्या वेळीं अमलांत असलेला इतर कोणताहि विधी या अन्वयें अशा जमिनी संबंधीचे सर्व अधिकार उपभोगण्यास हक्कदार असेल व सर्व बंधने (बोजा) पार पाडण्यास जबाबदार असेल.

परंतु भूसंपत्ति धारकानें कौलाच्या शर्तींअन्वयें सोडला म्हणून किंवा इतर रीतीनें द्यावयाची कोणतीहि खंडाची रक्कम किंवा कोणतीहि पैसा यापुढें वसूल करण्याजोगा असणार नाहीं.

(२) कायम धारण करणाऱ्यानें धारण केलेल्या कोणत्याहि जमिनीच्या संबंधांत जमीनमहसूल वसूल करण्याचा हक्क आणि कौलनाम्याच्या शर्तींअन्वयें अशा जमिनीसंबंधानें असलेला उत्तराधिकार किंवा मालकी नष्ट करण्याचा अधिकार कोणताहि असल्यास नष्ट करण्यांत आला आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

(३) पोट-कलम (१) मधील कोणत्याहि मजकुरामुळें भूसंपत्ति धारक या इसमाव्यतिरिक्त इतर इसमांच्या नांवें भूसंपत्तिच्या संबंधांत कौलाच्या शर्तींअन्वयें किंवा त्यात्या वेळीं अमलांत असलेल्या इतर कोणत्याहि विधी अन्वयें केलेला किंवा मान्यता दिलेला खास करार किंवा अनुदान या अन्वयें जमीनमहसूल भरण्याची पूर्ण पणें किंवा अंशत: माफी देण्यांत आलेली कोणतीहि जमीन धारण करण्याच्या कोणत्याहि इसमाच्या अधिकारास बाध येतो असें समजतां कामा नयें.

पडीत जमिनी वगैरे सरकारकडे निहित होणें.

४. (अ) कौलाच्या शर्तीं अन्वयें भू-संपत्ति धारकांची मालमत्ता नसलेल्या कोणत्याहि भूसंपत्तितील सर्व पडीत जमिनी,

(ब) कौलाच्या शर्तीं अन्वयें भू-संपत्ति धारकाची मालमत्ता असलेल्या परंतु तारीख १४ आगष्ट १९५१ पूर्वी कुळांना नेमून न दिलेल्या किंवा शेतीच्या कामीं उपयोगांत न आणलेल्या सर्व पडीत जमिनी, आणि

(क) जमीन महसूल अधिनियम १८७९, कलम ३७ यांत उल्लेख केलेल्या भूसंपत्ति धारकाव्यतिरिक्त ज्या कोणत्याहि व्यक्तिची किंवा मालमत्ता धारण करण्याची पात्रता असणाऱ्या व्यक्तिच्या समूहाची मालमत्ता नसेल अशा सर्व प्रकारच्या भूसंपत्तीतील मालमत्ता आणि अशा इसमांच्या त्यामध्यें किंवा त्यावर कोणताहि हक्क जेथवर प्रस्थापित होण्याचा अधिकार असेल तें खेरीज करुन आणि त्यात्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि विधीत इतर रीतीनें तरतूद केली असेल ती खेरीज करुन त्यावर किंवा त्याशीं संबंध असलेल्या सर्व हक्कांसह, राज्याची मालमत्ता आहे व तशी असल्याचें याअन्वयें जाहीर करण्यांत येत आहे आणि यथास्थिती अधिनियमाचें कलम ३७ किंवा ३८ या अन्वयें विहित केलेल्या रीतीनें व कारणां-करितां सदरहू प्राधिकाऱ्यानें त्यांची विल्हेवाट लावणें व विक्री करणें हे विधीसंमत असेल.

जंगलाबाबत हक्क.

५. विशेषेंकरुन सदरहू अधिनियमाअन्वयें भारताचा जंगलाबाबत अधिनियम, १९२७ या अन्वयें किंवा त्यात्या वेळीं अमलांत असलेल्या इतर कोणत्याहि विधी अन्वयें राखून ठेवण्यांत आलेल्या झाडांसंबंधीचे हक्क सरकारमध्यें निहित होतील आणि या अधिनियमातील कोणत्याहि मजकुरामुळें राज्यांत अमलांत असल्याप्रमाणेंच्या भारताचा जंगलाबाबत अधिनियम, १९२७ याचे उपबंध कोणत्याहि भूसंपत्तीतील जंगलांस लागू करण्याच्या राज्य सरकारच्या हक्कास कोणत्याहि प्रकारें बाध येणार नाहीं.

६. ह्या अधिनियमांत अन्यथा स्पष्टपणें जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, संहितेचे उपबंध कोणत्याहि भूसंपत्तीतील जमिनींस लागू होतील.

भूसंपत्तीतील जमिनींस संहिता लागू करणें.

७. (१) ह्या अधिनियमाच्या उपबंधांपैकीं कोणत्याहि उपबंधामुळे भूसंपत्ति धारकाचे किंवा कोणत्याहि इसमाचे मालमत्तेंतील त्याचे हक्क नष्ट होऊन किंवा त्यांत बदल होऊन नुकसान झाले असेल आणि असें हक्क नष्ट झाल्यामुळें किंवा त्यांत बदल झाल्यामुळें आपल्या मालमत्तेवरील हक्क सार्वजनिक मालकीचा झाला आहे असें सिद्ध केले तर अशा भूसंपत्ति धारकास किंवा इसमास नुकसान भरपाईसाठीं कलेक्टर कडे अर्ज करण्यांत अधिकार आहे.

(२). असा अर्ज ह्या अधिनियमांअन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेल्या नमुन्याप्रमाणें हा अधिनियम अमलांत आल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आंत केला पाहिजे.

जमिनीं-बाबतचें कोणतेहि हक्क नष्ट झाल्या-बद्दल किंवा त्यांत बदल केल्याबद्दल नुकसान-भरपाई देण्याची रीत.

(३) जमीन महसूल अधिनियमांत तरतूद केलेल्या रीतीनें रीतसर चौकशी केल्यानंतर कलेक्टरनें त्यास वाजवी व पुरेशी वाटेल अशी नुकसान भरपाई दिली पाहिजे ;

(अ) कोणत्याहि भूसंपत्तीतील जमिनीच्या संबंधांतील उत्तरधिकार हक्क नष्ट केल्याबद्दल द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम ही अशा जमिनींच्या प्रत्येक १०० एकरांमागें रुपये १० या दरानें हिशोब करून जी रक्कम येईल त्या रकमेपेक्षां अधिक असतां कामा नयें;

(ब) कोणत्याहि पडीत जमिनींतील किंवा कलम ४ कंडिका (क) मध्यें उल्लेख केलेली जी कोणतीहि इतर मालमत्ता कौलाच्या शर्तीअन्वयें भूसंपत्ति धारकाची मालमत्ता असेल त्या मालमत्तेंतील कोणताहि हक्क नष्ट केल्याबद्दल द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम ही अशा जमिनीच्या प्रत्येक १०० एकरांमागें रुपये २५ या दरानें हिशोब करून जी रक्कम येईल त्या रकमेपेक्षां अधिक असतां कामा नयें;

तसेंच कोणत्याहि भूसंपत्ति धारकाचा इतर कोणताहि हक्क किंवा अन्य कोणत्याहि इसमाचा कोणताहि हक्क नष्ट केल्याच्या किंवा त्यांत बदल केल्याच्या बाबतींत, कलेक्टरनें भूमि संपादन अधिनियम १८९४ याचे कलम २३ पोट-कलम (१) व कलम २४ यांच्या उपबंधांनुसार काम चालविलें पाहिजे.

(३-अ) (१) जेव्हां पोट-कलम (३) अन्वयें निवाडा करणारा अधिकारी ह्या अधिनियमान्वयेंचा कलेक्टर असेल परंतु जमीन महसूल अधिनियमाच्या ८ व्या कलमान्वयें नेमलेला कलेक्टर नसेल आणि अशा निवडयाची रक्कम पांच हजार रुपयाहून अधिक असेल तेव्हां उक्त निवाडा—

(अ) निवाडयाची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल तर जमिनमहसूल अधिनियमाच्या ८व्या कलमान्वये नेमलेल्या कलेक्टरच्या, किंवा

(ब) निवाडया ची रक्कम पंचविस हजार रुपयांहून अधिक असेल परंतु एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर कमिशनरच्या, किंवा

(क) निवाडयाची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर राज्य सरकारच्या, आगाऊ अनुमतीवांचून करतां कामा नयें.

(२) जेव्हां पोट-कलम (३) अन्वयें निवाडा करणारा अधिकारी या अधिनियमान्वयें कलेक्टर असेल आणि त्याचप्रमाणें तो जमीन महसुल अधिनियमाच्या ८व्या कलमान्वयें नेमलेला कलेक्टरहि असेल आणि अशा निवाडयाची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हां असा निवाडा,—

(अ) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर, कमिशनरच्या, किंवा

(ब) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर राज्य सरकारच्या, आगाऊ अनुमतीवांचून करता कामा नये.

(३) पोट-कलम (२) अन्वयेंचा प्रत्येक निवाडा भू-संपादन अधिनियम, १८९४ याच्या २६ व्या कलमांत विहित केलेल्या नमुन्यात असला पाहिजे.

(४) कलेक्टरचा निवाडा हा, पोट-कलम (५) च्या उपबंधास अधीन राहून अखेरचा असेल.

(५) कलेक्टरच्या निवाड्यामुळें किंवा निर्णयामुळें ज्याचे नुकसान झाले आहे अशा कोणत्याहि इसमास मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम १९३९ याअन्वयें रचना करण्यांत आलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(६) पोट-कलम (५) अन्वयेंच्या अपिलांचा निर्णय करतांना महसूल न्यायाधिकरणाने व्यवहार प्रक्रिया संहिता १९०८ अन्वयें मूळ न्यायालयानें दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलांचा निर्णय करतांना न्यायालयास जे अधिकार असतील ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत व न्यायालय जी कार्यरीती अनुसरत असेल ती कार्यरीती अनुसरली पाहिजे

मुदत.

८. ह्या अधिनियमान्वयें मुंबई महसुल न्यायधिकरणाकडें करावयाचे प्रत्येक अपील हे कलेक्टरच्या निवाड्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आंत दाखल केलें पाहिजे. भारतीय मुदत अधिनियम १९०८ कलमें ४, ५, १२, व १४, यांचे उपबंध हे असें अपील दाखल करण्यास लागू होतील.

न्यायालय शुल्क.

९. न्यायालय-शुल्क अधिनियम, १८७० यांत काहीहि असले तरी ह्या अधिनियमाअन्वयें मुंबई महसुल न्यायाधिकरणाकडें केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यांत येईल इतक्या किंमतीचा न्यायालयशुल्क मुद्रांक लावला पाहिजे.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९३ वा याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्यांच्या संबधांत फेर-तपासणीचे अधिकार.

९-अ. जेव्हां मुंबई भू-सत्ताप्रकार नाहींसे करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभापूर्वी कलम ७, पोट-कलम (३) अन्वयें कोणताहि निवाडा करण्यांत आला असेल आणि कलम ७, पोट-कलम (५) अन्वयें अशा निवाड्याविरुद्ध कोणतेंहि अपील दाखल करण्यांत आलें नसेल तेव्हां, कलम ७, पोट-कलम (४) यांत कोणताहि मजकूर असला तरीहि राज्य सरकारास अशा निवाड्यासंबंधींच्या चौकशीची किंवा कामकाजांची वैधता, सयुक्तिकता किंवा नियमबद्धता याविषयीं स्वतःची खात्री करून घेण्याच्या कारणाकरितां अशा चौकशीचें किंवा कामकाजाचें दप्तर मागविण्याचा अधिकार आहे आणि जर, हितसंबंधित पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर, अशा चौकशीच्या किंवा कामकाजाच्या वैधतेविषयीं, सयुक्तिकतेविषयीं किंवा नियम-बद्धतेविषयीं त्याची खात्री झाली नाहीं, तर त्यास, निवाडा रद्द ठरविण्याचा आणि नव्यानें निवाडा करण्याविषयीं कलेक्टरास निदेश देण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर निवाडा करण्यासंबंधींचें अशा निवाड्याच्या निर्णायकत्वासंबंधींचे आणि अशा निवाड्याविरुद्ध करावयाच्या अपिलासंबंधींचे, या अधिनियमाचे सर्व उपबंध, योग्य त्या फेरफारांनिशीं अशा नवीन निवाड्यास लागू होतील.

१० ह्या अधिनियमातील कोणत्याहि मजकुरामुळें मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अनिनयम १९४८ याचे कोणतेहि उपबंध हे ह्या अधिनियमाच्या विशेष उपबंधांशीं कोणत्याहि प्रकारें विसंगत असतील ती बाब खेरीज करून कोणत्याहि भूसंपतील कोणत्याहि जमिनींत किंवा एखाद्या भूसंपत्ति धारक व त्याची कुळें यांच्यातील परस्पर हक्कांस किंवा जबाबदाऱ्यांस लागू करण्यास कोणत्याहि प्रकारें बाध येतो, असें समजण्यांत येतां कामा नये.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या उपबंधान्वयें भू-संपत्ति-धारक व यांच्या कुळें संबंधांचे नियमन करणें.

११ राज्य सरकारास, ह्या अधिनियमाचे उपबंध पार पाडण्या प्रयोजनासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या अटीस अधीन रहातील आणि ते कायम करण्यांत आल्यानंतर राजपत्रांत प्रसिद्ध केलें पाहिजेत.

नियम

# अनुसूची

[ कलम २ (१) (फ) पहा ]

मुंबई उपनगर जिल्हा.

१. देवनार.
२. बोर्ले.
३. किरोळ.
४. कांजूर.
५. भांडूप
६. विक्रोळी.
७. व्यारवली.
८. चेंदवली.
९. पवई.
१०. तिरंदाज
११. कोपी
१२. सांकी.
१३. पासपोळी.
१४. तांगवन.
१५. कुर्ले.
१६. मरोळ.
१७. आसलपें.
१८. कोळे कल्याण
१९. मोहिली.
२०. पारजपूर.
२१. शाहार.
२२. मोग्रा (मोग्रें)
२३ वाशिवरें (ओशिवरें)
२४. बांधिवली.
२५. मरवली .
२६. माहूल.
२७. विले पार्ले.
२८. जुहू.
२९. हिरळी.
३० माजस.

ठाणें जिल्हा.

१. वेसावें बोरघाट.
२. चेना.
३. घोडबंदर
४. भाईंदर.
५. मिरा.
६. चिचवली.
८. दिंडोशो
९. बोरिवडे.
१०. दहिसर.
११. मागटणें
१२. आरें
१३. कान्हेरी..
१४. पार्ट पहाडी.
१५. गोरेगांव.
१६. पोयसर.
१७. वालनई.
१८. वढवाण
१९. एकसर.
२०. मालाड.
२१. तुळशी.